# नेहरु युवा केन्द्र संगठन
# NEHRU YUVA KENDRA SANGATHAN

विश्व का सबसे बड़ा युवा नेटवर्क

साथ साथ कल की ओर...

## कार्यालय राज्य निदेशक, महाराष्ट्र एवं गोवा
## OFFICE OF THE STATE DIRECTOR, MAHARASHTRA & GOA

स्वायत्तशासी संस्था An Autonomous Body under the
युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय Ministry of Youth Affairs & Sports
भारत सरकार Government of India

आज़ादी का अमृत महोत्सव


नेयुकस/महा-गोवा/संविधान दिवस पदयात्रा/2024-25/ 526 दिनांक: 12.11.2024

प्रति,

**मा. राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक**
**मुंबई विद्यापीठ**
**मुंबई**

**विषय : "संविधान दिवस पदयात्रा" - 26 नोव्हेंबर, 2024 भगवान गौतम बुद्ध उद्यान वरळी सी. फेस ते चैत्यभूमी, दादर या शासकीय कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक पाठविणे बाबत..**

**सन्दर्भ : नेयुकेसं, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. NYKS/Prog./2024-25/62 दिनांक 06.11.2024.**

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास अवगद आहे की, नेहरू युवा केन्द्र संगठन हे युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत कार्यरत असून भारताच्या सर्व जिल्हयांमध्ये नेहरू युवा केन्द्र कार्यालये कार्यरत असून राष्ट्रीय पातळीवर **मा. युवा कार्यक्रम व खेळ मंत्री, भारत सरकार हे नेहरू युवा केन्द्र संगठनचे मा. पदसिद्ध अध्यक्ष आहेत.** राज्य स्तरावर राज्याचे **मा. क्रीडा मंत्री हे मा. पदसिद्ध अध्यक्ष आहेत तर जिल्हा स्तरावर संबधित जिल्हयाचे मा जिल्हाधिकारी हे नेहरू युवा केन्द्र जिल्हा कार्यालयाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.** शासनाच्या निर्देशानुसार युवा विषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन या कार्यालयामार्फत करण्यात येते.

वरील संदर्भीय नवी दिल्ली मुख्यालयाच्या पत्रानुसार दि. 26.11.2024 रोजी **भारतीय राज्यघटनेला आपल्या भारतीयांनी अंगीकृत करून 75 वर्ष होत असल्यानिमित्त राष्ट्रीय स्तरावर राबविण्यात येत असलेल्या अभियानाअंतर्गत "संविधान दिवस पदयात्रा" कार्यक्रमांचे देशभर आयोजन केन्द्र शासनाद्वारा राज्यांच्या राजधानी स्थळी दि. 26.11.2024 रोजी करण्यात येत आहे.**

**या कार्यक्रमाचाच भाग म्हणून मुंबई येथे "संविधान दिवस पदयात्रा" कार्यक्रमाचे आयोजन दि. 26.11.2024 रोजी सकाळी 07.30 वा. करण्यात आले आहे. या कार्यक्रमात अंदाजे 700 युवक युवती सहभागी होतील. या कार्यक्रमाचा मार्ग खालीलप्रमाणे राहील.**

**भगवान गौतम बुद्ध उद्यान, वरळी सी. फेस (Gathering)- डावीकडे नमन बिल्डिंग - पोदार हॉस्पिटल (पीटर चौक)- डॉ. ॲनी बेझेंट रोड- साटम चौक- धर्मादाय आयुक्त भवन- भारत पेट्रोल पंप- नॅब वर्कशॉप फॉर द ब्लाइंड्स - बैंक ऑफ़ बरोदा- चंद्रसेन कांबळे चौक, बाबासाहेब वरळीकर चौक- स्वा. सावरकर मार्ग - पंजाब नेशनल बैंक- गॅमन इंडिया- श्री. सिद्धीविनायक मंदिर- इंडियन ऑइल पेट्रोल पंप- आर्किटेक्ट विद्याधर म्हात्रे चौक - चैत्यभूमी (समारोप).**

**कृपया आपण या शासकीय एक तासाच्या कार्यक्रमास आपल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे 500 स्वयंसेवक दि. 26.11.2024 रोजी सकाळी ठीक 07.15 वा. भगवान गौतम बुद्ध उद्यान, वरळी सी. फेस येथे सहभागी होण्यासाठी पाठवून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, हि विनंती.**

**आपला विश्वासू,**

12.11.24


**(प्रकाश कुमार मनुरे)**
राज्य निदेशक
मो. सं. 9425042477/8319250955


प्रतिलिपी : 1. **मा. रिजनल डायरेक्टर, एन. एस. एस., रिजनल कार्यालय, पुणे यांना** यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. **मा. निदेशक (कार्यक्रम),** नेयुकेसं, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार यांना माहितीस्तव सविनय सादर.